**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**आस्थापना विभाग**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी (ठाणे)

**जा.क्र.भिनिशमनपा/आस्था/११०४/२०२५**
**दिनांक :- ०४/०४/२०२५**

**परिपत्रक**

**विषय :-** २०२३-२४ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर, २०११.

उपरोक्त संदर्भिय शासकीय अधिकारी/कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) परिशिष्ट ब (भाग १), (भाग २), (भाग ३), (भाग ४), (भाग ५), मध्ये गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेसंबंधी सूचना करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णायानूसार अधिकारी/कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) यांचे विहित नमून्यातील गोपनीय अहवाल भरणेकामी दिलेल्या सुचनांनुसार काळजीपुर्वक व तपशीलवार गोपनीय अहवाल लिहून प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च पर्यंत संबंधितांचे प्रतिवेदन अधिकाऱ्याचे अभिप्रायसह तसेच पुनर्विलोकन अधिका-यांची अंतिम स्वाक्षरी घेऊन गोपनीय अहवाल आस्थापना विभागात सादर करणे बंधनकारक आहे, तथापी, बहुतांशी अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे २०२३-२४ या वर्षाचे गोपनीय अहवाल विहित नमून्यात भरुन सादर केल्याचे दिसून येत नाही.

यास्तव, महानगरपालिका आस्थापनेवर कायम सेवेत कार्यरत असलेले सर्व अधिकारी/ कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) यांनी त्यांचे सन २०२३-२४ या वर्षाचे गोपनीय अहवाल विहित नमून्यात भरुन सदर गोपनीय अहवाल संबंधीत प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे सादर करावेत, प्रतिवेदन अधिकारी यांनी त्यांचा स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद करुन सदर गोपनीय अहवाल संबंधीत पुनर्विलोकन अधिका-याकडे सादर करावेत, तद्नंतर पुनर्विलोकन अधिकारी यांनी सदरचे गोपनीय अहवालावर अंतिम स्वाक्षरी करुन दि.११/०४/२०२५ रोजीपर्यत गोपनीय अहवाल जतन करुन ठेवणेकामी आस्थापना विभागात सादर करावेत, यात कसूर होता कामा नये.

(रोहिदास दोरकुळकर)
**उपआयुक्त (मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रति,**
**सर्व अधिकारी/ कर्मचारी वृंद (वर्ग-१,२,३)**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका.**

**प्रत :**
**१.सर्व नियंत्रण अधिकारी, भिवंडी मनपा.**
**२.सर्व विभाग प्रमुख, भिवंडी मनपा.**
**३.निवड नस्ती (आस्थापना)**

**प्रत, माहितीस्तव सविनय सादर :**
**१.मा.प्रशासक तथा आयुक्त सो., भिवंडी मनपा.**
**२.मा.अतिरिक्त आयुक्त सो., १ व २, भिवंडी मनपा.**